महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद नागपुर
कार्यालय दुरध्वनीक्रमांक ०७१२-२५६४८४३, ५६०६५ ई-मेल-dhonagpur2019@gmail.com

जा. क्र./जिपना/आरोग्य/वैअगट-अ/ स्था-२/4261/२०२४ दिनांक - 7 ऑगस्ट,२०२४

प्रती,

मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
जिल्हा परिषद, नागपूर

विषय : जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत
विभागीय वृत्तपत्र एक व स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रकाशीत करण्याबाबत

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास विनंती करण्यांत येते की, सोबत जोडलेल्या जाहीरात व वृत्त प्रसिध्द करण्याची व्यवस्था करण्यात यावी. आवश्यक माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. कार्यालयाचे नाव व पत्ता | : | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर |
| २. ज्या जिल्हयात काम आहे | : | नागपूर जिल्हा |
| ३. जाहीरात प्रकाशीत करण्याची शेवटची तारीख | : | दिनांक 10 ऑगस्ट २०२४ |
| ४. जाहिरात प्रकार | : | कंत्राटी वैद्यकीय अधिकारी भरती (वार्षिक ) |
| ५. जाहिरात देयक कुणास सादर करावयाचे त्यांचे नाव | : | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर |
| ६. जाहिरात प्रस्तुत वृत्तपत्रे | : | विभागीय वृत्तपत्र एक व स्थानिक वृत्तपत्र एक |
| ७. जाहिरात प्रत्येक वृत्तपत्रात किती वेळ प्रसिध्दीस दयावयाची आहे. | : | एक वेळा फक्त |

(डॉ.राजकुमार गहलोत )
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर

महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद नागपुर
कार्यालय दुरध्वनीक्रमांक ०७१२-२५६४८४३, ५६०६५ ई-मेल-dhonagpur2019@gmail.com

# जाहीरात

## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नागपूर

**वॉक इन इंटरव्ह्यूव्दारे तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत.**

## थेट मुलाखत

मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षेखाली गठीत करण्यांत आलेल्या निवड समितीव्दारे आरोग्य सेवा, या सवंर्गातील नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे तदर्थ वैद्यकीय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे ११ महिण्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत.

सदरहू तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पदे भरण्यासाठी दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी बुधवार वॉक इन इंटरव्ह्यू दुपारी ०३.०० ते ०४.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळुन ) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या दालनात आयोजीत करण्यांत येत आहे. बुधवारला शासकीय सुटी असल्यास लगतचे दुसरे दिवशी मुलाखत घेण्यांत येईल तरी मुलाखतीस इच्छुक उमेदवारांनी मुलाखत वेळेच्या २ तास अगोदर आरोग्य विभाग जिल्हा परिषद, नागपूर येथे उपस्थित राहावे.इच्छुक एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एम. उमेदवारांनी थेट मुलाखतीकरीता नमूद दिनांक व वेळेत उपस्थित राहावे. यानंतर वरील प्रमाणे दर बुधवारी पदे रिक्त असल्यास मुलाखत सत्र सुरु राहील.

उमेदवारांनी येतांना सोबत एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एम. पदव्युत्तर पदवी / पदविका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिका, पदविका / पदवी प्रमाणपत्र, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र,अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादीसोबत घेवून येणे आवश्यक आहे.

उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनधिकृत गैरहजर असलेल्या /संपामध्ये सहभागी असलेले / शासन सेवेत शिस्त भंग कार्यवाहीकरिता काढून टाकलेले वैद्यकीय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.

अ) एम.बी.बी.एस. पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात ८०,०००/- व इतर भागात रुपये ७५,०००/- एवढे मानधन राहील.
ब) बी.ए.एम.एस. पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात ४५,०००/- व इतर भागात रुपये ४०,०००/- एवढे मानधन राहील.

स्वाक्षरी
( राजकुमार गहलोत )
सदस्य सचिव,निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर